Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

९

# वैश्विक साहित्यात संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचे स्थान

संशोधक विद्यार्थीनी
श्री. शिवाजी विज्ञान, कला महाविद्‌यालय चिखली
जि. बुलडाणा अमरावती विद्‌यापीठ

**प्रास्ताविक :**

मराठी आणि हिंदी साहित्यामध्ये संत काव्याला महत्त्वाचे स्थान आहे. मराठी साहित्याची सुरुवात संत काव्याने झाल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे हिंदी साहित्याची सुरुवात देखील संत साहित्याने झाल्याचे आढळते. भारताचा मध्ययुगीन कालखंड हा बहुतांशपणे संत साहित्याने झाल्याचा आढळते. तेराव्या शतकापासून ते अठराव्या शतकापर्यंत भारतीय कालखंड हा संत साहित्याच्या सुरुवातीपासून चक्रधरस्वामी, संत एकनाथ व संत तुकाराम महाराजांसारखी अनेक संत मंडळी होऊन गेली आहे. तुकोबांनी जाणीवपूर्वक लोकोद्धारासाठी ओवी, अभंगाचा वापर केला. त्यांच्या विविध छंद वृत्तातील कवितांना अभंग असेच म्हटल्या जाते. संत परंपरेत, पारमार्थिक तत्त्वज्ञान – ऐच्छिक लोकजीवनाचे तत्त्वज्ञान आणि वास्तव समोर ठेवून, अभंगरचना करणारे तुकोबा हे एकमेव संत होते. तुकारामांच्या काळातच नव्हे तर आजही समाजाच्या तोंडून 'तुका म्हणे' हा अभंग बाहेर पडतो. कारण तुकाराम महाराज महाराष्ट्राचे म्हणजे महाराष्ट्रातील बहुजनांचे खरेखुरे प्रतिनिधी होते. त्यामुळे बहुजनांचे जीवनच तुकाराम महाराजांच्या काव्यात प्रतिबिंबित झालेले दिसते. म्हणूनच इतर कोणत्याही संत कवी पेक्षा तुकारामांची अभंगगाथा लोकप्रिय आहे आणि मराठी भाषा व मराठी मन कायम आहे तोपर्यंत ती अशीच लोकप्रिय राहील यात शंका नाही.

**उद्दिष्टये :**

१) वैश्विक साहित्यात संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचे स्थान विशद करणे.
२) संत तुकाराम महाराज यांचे सामाजिक अभंग विश्लेषण करणे.
३) संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचा आढावा घेणे.
४) अभंग व सामाजिकता यांचे नाते स्पष्ट करणे.
५) संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून आलेल्या सामाजिक पैलूंचा शोध घेणे.

**गृहीतके :**

१) संत तुकाराम महाराजांना समाज सुधारक म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे.
२) संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून त्यांचे समाज वास्तव प्रकट होते.

३) संत तुकाराम महाराजांच्या अभंग वाणीतून त्यांच्या कार्याचा ठसा दिसून येतो.

४) संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगवाणीचा उपयोग समाज प्रबोधनासाठी केलेला आहे.

५) संत तुकाराम महाराजांनी समाजविषयक मुल्यांचा अभंगवाणीत समावेश केला आहे.

**संत तुकाराम महाराजांचे सामाजिक अभंग :**

तुकोबांचा अभ्यास ही एक स्वतंत्र ज्ञानशाखाच मानावी लागते. तुकोबांची अभंग गाथा हे एकमेव या शाखेचे अभ्यास साधन आहे. एकूण ४२ वर्षांचा तुकोबांचा कालखंड परंतु या अल्पशः कालखंडातच तुकोबांनी संत, कवी, समाजसुधारक आणि धर्मसुधारक म्हणून ऐतिहासिक कार्य केले. श्री तुकाराम महाराजांचे सुमारे साडेचार हजार अभंग उपलब्ध आहे. तुकारामांचे व्यक्तिमत्त्व एकीकडे दुष्ट प्रवृत्तीवर हल्ला करण्याइतके कणखर आणि दुसरीकडे भक्तीने भरलेले अतीशय मृदू असे होते. त्यांच्या अभंगाची शैली तशी परखडही आहे आणि हळूवारही आहे.

'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास ।
कठीण वज्रासी भेदु ऐसे ।। (१)

असे तुकाराम महाराजांनी स्वत:चे वर्णन केले आहे.

तुकाराम महाराजांच्या अभंगातून त्याचे मन प्रकट होते. समाजातील सर्व अनिष्ट प्रथाचा, घातक रूढींचा ते निषेध करतात. जातीभेद त्याना मान्य नाही तसेच तुकोबाना सामाजिक प्रगतीचे पूर्णपणे भान होते, असे त्याच्या अनेक अभंगावरून सहजपणे लक्षात येते. तुकोबांनी समाजातील अनेक नात्यागोत्यांचे, वस्तूंचे, सामाजिक व्यवहारातले दृष्टांत सहजपणे सांगितले आहे. त्यातुनही तुकोबांची समाजनिरीक्षण किती सूक्ष्म होते हे पटण्यासारखे आहे.

'जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेची जाणावा । (२)

अशी तुकोबांनी समाज माणसाची ओळख करून देणारी परिभाषा मांडली होती.

तुकोबा समाजाचे समीक्षक, निरीक्षक, सर्जन होते, असे सदानंद मोरे यांनी म्हटले आहे.३ तुकोबांच्या व्यक्तीमत्त्वात प्रखर सुधारणावाद होता, असे भालचंद्र नेमाडे यांनी म्हटले आहे. ४ ल.रा. नसीराबादकर म्हणतात, ''रूढ संकेतांच्या दांभीकपणाच्या आणि अंधश्रद्धेच्या विध्वंसाने प्रथमच समाजाची मनोभूमी नांगरून तिच्यात प्रांजळ भक्तीभाव, नीती आणि समाजोद्धाराचे विधायक बी पेरणारा संत म्हणजे तुकाराम होय.'' ५

समाजातील दुर्जनांचा अनेक अभंगातून त्यांनी नि:पात घडवून आणला. कठोर शासन करण्याचा आग्रह धरला. भक्त आणि माणूस भिन्न नसून विठ्ठलाच्या भक्तानेच समाजशुद्धीचे कार्य केले पाहिजे असे त्यांना खालील अभंगावरून सांगितले.

भीत नाही आता आपुल्या मरणा ।

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

दु:खी होता जना न देखवे ।। (६)

अशा अनेक अभंगातून त्यांनी दूर्जनांविरुद्ध बंड पुकारल्याचे दिसून येते.

**तुकोबांच्या अभंगातून दिलेली सामाजिक शिकवण :**

तुकाराम महाराजांनी तत्कालीन समाजातील ज्या गैरसमजुती आणि दुराचार होते त्यांच्यावर टीका टिप्पणी करून समाजाला निखळ आणि शुद्धचरणाची शिकवण दिली. द्रव्य घेउन कथा करू नये, अशीही शिकवण तुकोबांनी दिली आहे. कीर्तनकाराने समाजात किती शुद्ध आचरण करावे द्रव्य घेऊ नये, माथी टिळा, बुक्का लावू नये, कीर्तनाच्या जागी अन्नही घेऊ नये, कीर्तन हा पोटापाण्यासाठी करू नये असे अनेक सामान्य नीती विचार तुकोबांनी मांडले आहे. तुकोबांनी राष्ट्रीय जागरूतीच्या दृष्टीने पाईकाचे अभंग लिहून शिपायांची आचार संहीता सांगितली आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राला व्यापणारा उपदेश तुकोबांच्या अभंगवाणीत आढळतो. समाजाला सदाचारी शिकवण देणारे तुकोबा संतांच्या मालिकेतील लोकप्रिय संत आहे.

**सामाजिक समतेच्या अभंगाचा उद्घोष :**

तुकाराम महाराजांनी आपल्या सामाजिक श्ब्दाचा उपयोग अभंगातून वारंवार केलेला आहे. हा उद्घोष करीत असतांना समाजातील जातीपातीची बंधने पूर्णत: गळूनपडून एकसंघ, समाजसुखाने नांदावा ही त्यांची उदात्त, व्यापक भुमिका आहे. जशी त्यांनी अध्यात्मीक क्षेत्रात सामाजीक समता उभारलेली आहे तशीच ती व्यवहारीक लोकजीवनानंतरही प्रतिबिंबीत व्हावी. त्यांनी अध्यात्मीक समतेसह व्यवहारिक लोकजीवनातील समतेचा स्वीकार केलेला आहे. तुकाराम महाराजांनी केलेल्या सामाजीक समतेच्या उद्घोषणा पुढील प्रमाणे आहे.

१) न पाहे शिदोरी । जाती कुळ न विचारी ।

२) शुध्द हीन काही न पाहसी कुळ । करिसी निर्मळ वास देही।।

३) न म्हणे याती कुळ ।।

४) बहुता जातीचा केला अंगीकार ।।

५) भेदाभेद नाही । तुकाम्हणे तीच्या ठायी ।। (५)

**समारोप :**

एकंदर वरील विवेचनावरुन हे स्पष्ट होते की, तुकारामांनी माणसाचे अंतर्बाहृय जीवनच अभंगामधून प्रकट केलेले आहे. तुकोबांचे सामाजिक अभंग, कार्य, समाजाकडे पाहण्याचा दृष्टीकोन तसेच समाजात निर्मान झालेल्या परिवर्तनाचे तत्कालीन वातावरण आणि त्याचा भविष्यकाळात उमटलेला पडसाद हे सर्व पाहता तुकोबांच्या सामाजिक अभंगाचा प्रभाव जानवतो.

**संदर्भ सूची :**

१) आवलगावकर रमेश, महानुभाव व संत वाड्.मय, यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, पुणे MAR251
प्रथम प्रकाशन जून २००२, पृ.क्र.७४.

२) सानप, किशोर समग्रतुकाराम दर्शन, विजय प्रकाशन, नागपूर २००८ पृ.क्र. ४३६.

३) तत्रैव, पृ.क्र.४३६.

४) सानप किशोर/ तायडे प्रा. मनोज, तुकाराम व्यक्तिमत्व आणि कवित्व, लोकवाड्.मय गृह प्रकाशन, सातवी
आवृत्ती मुंबई, मे २०१० पृ.क्र.४७.

५) मोहरीर का. ला, संत तुकारामांची जीवननिष्ठा, सविता प्रकाशन १९९४, पहिली आवृत्ती २५ मे १९९४, औरंगाबाद, पृ.क्र. १६८.